# बृहन्मुंबई महानगरपालिका

# माहिती तंत्रज्ञान विभाग

## माहितीचा अधिकार अधिनियम 2005
## कलम 4 (1) (ब) मधील तरतूदीनुसार
## माहितीची निर्देश पुस्तिका

| अनु. क्र. | मॅन्युअल क्र. | शिर्षक |
|---|---|---|
| 1 | - | प्रस्तावना |
| 2 | 1 | खात्याची रचना, कार्ये, कर्तव्ये यांचा तपशील |
| 3 | 2 | अधिकारी आणि कर्मचारी यांचे अधिकार आणि कर्तव्ये |
| 4 | 3 | कार्यपूर्तीसाठी नियम, विनियम, सुचना पुस्तिका आणि अभिलेख |
| 5 | 4 | धोरणाची आखणी किंवा त्याच्या अमंलबजावणी संबंधात जनतेच्या प्रतिनिधीचा सल्ला किंवा त्यांचे प्रतिनिधित्व करण्याबाबत विद्यमान व्यवस्थेचा तपशील |
| 6 | 5 | धारणाधीन किंवा नियंत्रणाधीन दस्तऐवजाच्या प्रकारांचे विवरणपत्र |
| 7 | 6 | घटक म्हणून प्रस्थापित झालेली मंडळे, परिषदा, समित्या व इतर गट याबाबतचे विवरणपत्र |
| 8 | 7 | माहिती अधिका-यांची नावे,पदनाम व अन्य तपशील |
| 9 | 8 | निर्णय घेणाच्या प्रक्रियेमध्ये अवलंबली जाणारी पध्दत |
| 10 | 9 | अधिकारी व कर्मचा-यांची निर्देशिका |
| 11 | 10 | नियमांतर्गत उपलब्ध असलेल्या भरपाई योजना कार्यप्रणालीसह, प्रत्येक अधिकारी व कर्मचा-यांना मिळणारा मासिक मोबदला |
| 12 | 11 | प्रत्येक अभिकर्तासाठी दिलेली अर्थसंकल्पीय तरतूद (सर्व योजना, प्रस्तावित खर्च आणि वितरण अहवाल यांचा तपशील) |
| 13 | 12 | अर्थसहाय्य कार्यक्रमाच्या अंमलबजावणीची पध्दत |
| 14 | 13 | संस्थेने दिलेल्या सवलती, परवाने किंवा प्राधिकारपत्रे प्राप्त करण्यांचा तपशील |
| 15 | 14 | संस्थेने आपल्या कार्यपूर्तीसाठी आखून दिलेली प्रमाणके |
| 16 | 15 | इलेक्ट्रॉनिक स्वरुपात उपलब्ध असलेली माहिती |
| 17 | 16 | नागरिकांना माहिती मिळण्यासाठी  उपलब्ध सुविधांचा तपशील |
| 18 | 17 | इतर उपयुक्त माहिती |

**प्रकरणः- 1**

**<u>प्रस्तावना</u>**

1.1 हे निर्देश पुस्तक माहितीचा अधिकार अधिनियम 2005 मधील कलम 4 (एक) (ब) मधील तरतूदीनुसार प्रसिध्द करण्यात आले आहे.

1.2 या निर्देश पुस्तकाचा उद्देश विविध अधिनियम, नियम आणि विनियम यामधील तरतूदीनुसार माहिती तंत्रज्ञान खात्याची रचना, कामे आणि कर्तव्ये यांचे तपशील, या खात्यामधील कर्मचारी, अधिकारी यांचे अधिकार आणि कर्तव्ये तसेच कामे पार पाडण्यासाठी निश्चित करण्यात आलेले निकष यासंबंधीची माहिती नागरिकांना उपलब्ध करुन देण्याचा आहे.

1.3 या निर्देश पुस्तकात माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम कलम 4 (एक) (ब) मधील तरतूदीअन्वये आवश्यक असल्याप्रमाणे अनुक्रमणिकेत नमूद केलेल्या विषयासंबंधी 17 मॅन्युअल्सचा अंतर्भाव आहे.

1.4 या निर्देशपुस्तकात अंतभूर्त असलेल्या कोणत्याही विषया संबंधी स्पष्टीकरण अथवा माहिती हवी असल्यास खालील अधिका-यांशी संपर्क साधावा.

जन माहिती अधिकारी (व्यवस्थापक (मा.तं.) 01/02/03/04 आणि प्रशासकीय अधिकारी (मा.तं.))

संचालक (माहिती तंत्रज्ञान विभाग)

महानगरपालिका मुख्यालय,

नविन विस्तारित इमारत,

तळमजला, महानगरपालिका मार्ग,

मुंबई 400001

1.5 ज्या व्यक्तिला कोणतीही माहिती मिळविण्याची इच्छा आहे तिने याबाबत विहित केलेल्या शुल्कासह अधिकृत भाषेत (राजभाषेत) लेखी स्वरूपात किंवा इलेक्ट्रॉनिक साधनांच्याव्दारे विनंती करावी.